दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक १६१ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शुक्रवार, दि.२९ ऑगस्ट २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

SHREE VAIBHAVLAXMI ENTERPRISES

URGENTLY REQUIRED
MALE CANDIDATES - FOR PROPERTY REGISTRATION
WORK IN PANVEL AND NAVI MUMBAI
MALE CANDIDATES - OFFICE BOY
MALE/FEMALE CANDIDATE -
FOR XEROX MACHINE OPERATOR WITH BASIC COMPUTER KNOWLEGE
E-MAIL-shreevaibhavlaxmienterprises@gmail.com MOB.NO. 9892848890
ADD. - SHOP NO.02, GROUND FLOOR, BULAND 2,
PLOT NO. 22, SECTOR 5A, NEW PANVEL, RAIGAD 410 206.

### पनवेल महानगरपालिका क्षेत्रात भावपूर्ण वातावरणात नियोजनबध्दरित्या

# दीड दिवसाच्या गणपतींना निरोप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागात सुमारे ५६० पेक्षा अधिक (संध्याकाळी साडेसहापर्यंत) दीड दिवसाच्या घरगुती गणपतींचे भाक्तिमय वातावरणात नियोजनबध्दरित्या शांततेत विसर्जन करण्यात आले.

माझी वसुंधरा ६.० अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पनवेलसाठी पनवेल महानगरपालिका विविध उपक्रम राबवित आहे. या अंतर्गतच सणांचं पावित्र्य आणि पर्यावरणाचे भान राखले जावे यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी ‘उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा’ ही मोहिम हाती घेतली आहे. गणेशभक्तांच्या सोयी – सुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग, परवाना विभाग, भांडार विभाग, वाहन विभाग व वैद्यकीय विभाग,पर्यावरण विभाग या ८ विभागांच्या माध्यमातून समन्वय साधून विसर्जन



घाटांवरती संपूर्ण तयारी करण्यात आली होती. याकामी विविध एनजीओ, सामाजिक संघटना देखील महापालिकेस सहकार्य करत आहेत.

यावर्षी महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या वतीने एकुण १३४ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली आहे. यामध्ये ५८ ठिकाणी नैसर्गिक विर्सजन ठिकाणे असून ७६ ठिकाणी कृत्रिम तलावांची विसर्जनासाठी सोय करण्यात आली आहे.

या सर्व विसर्जनाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटिव्ही स्टेज, टॉवरची सोय, टेबल खुर्च्या, लाऊड स्पीकर,निर्माल्य कलश, लाईव्ह जॅकेटची सोय करण्यात आली आहे.

दरम्यान विसर्जन कार्यक्रम सुरळित पार पडावा यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त वैभव विधाते, शहर अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने ,चारही प्रभाग अधिकारी यांनी पालिकेच्या सर्व विसर्जन ठिकाणांना भेटी देऊन व्यवस्थेचे निरीक्षण केले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विसर्जन घाटांवर गणपतींचे सुरळीत विसर्जन व्हावे यासाठी महापालिकेच्या वतीने अग्निशमन दल, वाहतूक विभाग, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, घनकचरा व आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, सफाई कर्मचारी, मुख्यालय कर्मचारी तसेच पोलिस विभागाच्या वतीने चोख बंदोबस्त करण्यात आला आहे. तसेच वैद्यकिय आरोग्य विभागाच्या वतीने प्रत्येक विसर्जन स्थळांवरती प्राथमिक उपचारार्थ सेवा देण्यात येत आहे.

# कोपर (गव्हाण) येथे जे.एम. म्हात्रे कुटुंबियांच्या घरी श्री गणेशाचे सात दिवसांचे आगमन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

गणेश चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जे.एम. म्हात्रे कुटुंबीयांच्या रंजना बंगला, कोपर (गव्हाण) येथे लाडक्या गणरायाचे आगमन झाले आहे. सात दिवसांच्या या उत्सवाचे औचित्य साधून भक्तांसाठी दर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६:०० नंतर भाविकांनी सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहून श्री गणरायाचे दर्शन घेऊन आशीर्वाद घ्यावा असे निमंत्रण मा.नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे (चेअरमन, जे.एम. म्हात्रे इन्फ्रा प्रा. लि.) प्रितम जनार्दन म्हात्रे (अध्यक्ष, जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था) यांच्याकडून करण्यात आले आहे.



**पोतदार कुटुंबियांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या गणरायाचे दर्शन घेताना पनवेल महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये**

# दिड दिवसांच्या २५ हजार ५५१ गणेश मूर्तीचे विसर्जन



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’ अशा जयघोषात, साश्रुनयनांनी रायगड जिल्ह्यातील गणेशभक्तांनी दीड दिवसांच्या बाप्पाला निरोप दिला. जवळपास २५ हजारांहून अधिक दीड दिवसांच्या बाप्पाला जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला. तलाव, समुद्रकिनारे, नद्यांमध्ये विसर्जन सोहळा पार पडला.

बुधवारी (दि.२७) वाजत-गाजत, ढोल-ताशांच्या गजरात, टाळ-मृदुंगाच्या निनादात लाडक्या बाप्पाचे घरोघरी आगमन झाले हाते. जिल्ह्यात एक लाख दोन हजार ४८४ गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. गुरुवारी (दि. २८) दीड दिवसाच्या बाप्पाला जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला. तलाव, समुद्र, नद्यांमध्ये २५ हजार ५५१ गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले. ’गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’ असा जयघोष करीत टाळ-मृदुंगासह बेंजोच्या तालावर नाचत विसर्जन ठिकाणापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. बाप्पा आल्यावर जितका आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर होता, तितकेच दीड दिवसांच्या बाप्पाला निरोप देतानाचे दुःखही चेहऱ्यावर दिसत होते. बाप्पाच्या विसर्जनावेळी कोणतीही अनुचित घटना घडू नये, म्हणून सतर्कतेच्या दृष्टीने रायगड पोलिसांकडून सुरक्षेच्या बाबतीत खबरदारी घेण्यात आली होती. अलिबाग नगरपरिषदेच्यावतीने समुद्रकिनारी साफसफाई करण्यात येऊन विसर्जनास येणाऱ्या भाविकांच्या मदतीसाठी मदत केंद्र उभारण्यात आले होते.

# ऐन गणेशोत्सवात सुधागड तालुक्यात तब्बल ८ तास वीज गुल

### झाड व वीज पडल्याने विद्युत तारा तुटल्या इन्सुलेटर फुटले

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

ऐन गणेशोत्सवात गुरुवारी (ता. २७) पहाटे चार ते दुपारी बारा वाजेपर्यंत सुधागड तालुक्याची वीज तब्बल आठ तास गुल होती. झाड व वीज पडल्याने विद्युत तारा तुटल्या आणि इन्सुलेटर फुटले त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला होता.

याबाबत सविस्तर माहिती अशी की वारा पाऊस यामुळे उंबरवाडी येथील जंगलात एका ठिकाणी झाड कोसळून विजेच्या तारा दोन ठिकाणी तुटल्या तर येथे दुसऱ्या ठिकाणी वीज पडून इन्सुलेटर फुटले व विजेच्या तारा तुटल्या परिणामी संपूर्ण सुधागड तालुक्यातील वीज पुरवठा पहाटे चार वाजता खंडित झाला. याबाबत पाली वीज वितरण कार्यालयाचे उपकार्यकारी अभियंता बालाजी चात्रे यांनी सांगितले की वीजपुरवठा खंडित झाल्यावर वीज महावितरणचे कर्मचारी लागलीच दोष (फॉल्ट) शोधण्यासाठी निघाले. त्यावेळी लक्षात आले की उंबरवाडी येथे फॉल्ट आहे. हे क्षेत्र पूर्ण डोंगराळ व दाट वनांचे आहे. त्यामुळे दोष झालेल्या ठिकाणी महावितरणचे कर्मचारी अथक परिश्रम घेऊन पोहोचले. त्या ठिकाणी पोचल्यावर लगेच झाड तोडण्याची तसेच वीज तारा जोडण्याचे आणि इन्सुलेटर बसवण्याचे काम सुरू करण्यात आले, यासाठी काही वेळ लागला. मात्र वीज महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम करून अखेर वीजपुरवठा पुन्हा सुरळीत केला असे उपकार्यकारी अभियंता बालाजी चात्रे यांनी सांगितले. मात्र ऐन गणेशोत्सवात तब्बल आठ तास वीजपुरवठा




खंडित झाल्यामुळे सुधागड तालुक्यातील जनता मेटाकुटीला आली होती.

पावसाळ्यात वीज खांबावर वीज कोसळल्यामुळे तीव्र उच्च दाबामुळे विद्युत यंत्रणेतील सुरक्षा कवच असणा-या या इन्सुलेटर्सना तडे जातात व ते फुटतात. म्हणून पावसाळ्यात वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढते. तेव्हा नेमका बिघाड शोधण्याकरीता रात्री-अपरात्री वीज कर्मचा-यांना गस्त घालावी लागते, कसून तपासणी करावी लागते. ती विद्युत वाहिनी कधी रस्त्याकडेने, कधी शेतातून, झाडी वनांतून तर कधी ओढयातून, डोंगरातून गेलेली असते.

# गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकी दरम्यान लेझर लाईट वापरण्यावर बंदी

**दै.रायगड नगरी । पेण**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्री गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान लेझर लाईटमुळे नागरिक तसेच बंदोबस्तासाठी नियुक्त अधिकारी-कर्मचारी यांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा विचार करता, जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे.

दि. ०२ सप्टेंबर २०२५ (५ दिवसांचे विसर्जन) आणि दि. ०६ सप्टेंबर २०२५ (११ दिवस-अनंत चतुर्दशी) रोजी होणाऱ्या श्री गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान लेझर लाईटचा वापर करण्यास कडक बंदी घालण्यात आली आहे.

अनेकदा मिरवणुकीतील ध्वनीक्षेपकांचा दणदणाट, डॉल्बी साऊंड सिस्टम, स्नो स्प्रे, हिट स्प्रे आणि लेझर बीम लाईट्समुळे नागरिकांना बहिरेपणा, हृदयविकाराचे झटके तसेच डोळ्यांचे आजार उद्भवले असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि आरोग्याच्या दृष्टीकोनातून ही कारवाई करण्यात आली आहे.

सदर आदेशाचा भंग करून विसर्जन मिरवणुकीत लेझर लाईट वापर करणाऱ्या व्यक्ती/संस्था/मंडळ/संचालक यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये दंडनीय कारवाई केली जाईल, असा इशारा जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिला आहे

**गाळा विकणे आहे**

**नवीन कोर्टा समोर दुकानी (शॉप) ६५० स्के फुट गाळा विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा.**

**9892181313**

## गिरण्यांच्या जमिनींना ग्रहण

मुंबईतील 'कमला'सह सहा गिरण्यांच्या जमिनीवरील पुनर्विकासाच्या कामात नियमांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन झाले असल्याचा ठपका विधिमंडळाच्या आश्वासन समितीने ठेवला आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनात एखाद्या प्रश्नाच्या उत्तरात सरकारकडून जी आश्वासने दिली जातात, त्यांची पूर्तता योग्य रीतीने होते किंवा कसे हे पाहण्यासाठी विधिमंडळाच्या सदस्यांची ही समिती आहे. या समितीने ३० व ३१ जुलै रोजी मिठी नदी व मुंबईतील १२ गिरण्यांना विधिमंडळातील सरकारने दिलेल्या आश्वासनाबाबत भेटी दिल्या व त्यातून वरील बाबी समोर आल्या. मुळात बंद पडलेल्या गिरण्या पुन्हा सुरू करण्यासाठी भांडवलाची उभारणी करणे गिरणी मालकांना शक्य व्हावे म्हणून गिरण्यांच्या अतिरिक्त जमिनी विकण्याची उपाययोजना सुरू केली गेली होती. खरं सांगायचे तर संपामुळे गिरण्या बंद पडल्या, असा गैरसमज राज्यातील सामान्य जनतेच्या मनात सरकार व मालकधार्जिण्या विचारवंतांनी इतका रुजवला की आज तेच सत्य असल्याचे असंख्यांना वाटते. मात्र, डॉ. दत्ता सामंत यांनी पुकारलेला संप तांत्रिकदृष्ट्या कधीच मागे घेतला नाही. दीड वर्षं मुंबईतील जवळपास दीड ते दोन लाख कामगारांनी अत्यंत नेटाने हा संप चालवला होता. पुढे मात्र कामगारांचा धीर सुटत चालला व त्यांनी माना खाली घालून हरलेल्या सैन्याप्रमाणे पुन्हा कामावर जायला सुरुवात केली होती. त्यामुळे मुंबईतील सगळ्या गिरण्या व्यवस्थित सुरू झाल्या होत्या. इतकेच नव्हे तर ऐंशीच्या दशकाच्या मध्यावर मुंबईतील एका गिरणीने १०० कोटींचा नफा कमावल्याची बातमी अर्थ वृत्तांकन करणाऱ्या एका अग्रणी दैनिकाने पहिल्या पानावर मुख्य बातमी म्हणून प्रसिद्ध केली होती.१९९१ साली शरद पवार यांनी मुंबईतील विकास नियमावलीत बदल केला व गिरण्यांच्या आधुनिकीकरणासाठी भांडवलाची गरज असून, गिरण्यांच्या जमिनीच्या विक्रीस परवानगी दिली. त्यात ही विक्री करताना जमिनीचे तीन समान हिस्से करून त्यातील एक मालकास, दुसरा मुंबई महानगरपालिकेस व तिसरा सर्वसामान्यांसाठी घरे व्हावीत म्हणून 'म्हाडा'ला देण्याचे ठरले होते. गिरण्या बंद होण्याची सुरुवात ही विकास नियमावलीतील या बदलानंतर झाली. गिरणी मालकांची दोन तृतियांश जमीन यात जाणार असल्यामुळे चारचा एफएसआय देऊन त्यांचा तोटा भरून काढण्याची सूटही सरकारने दिली होती. तरीही मालकांचे रडगाणे सुरू झाल्याने पुढे दहा वर्षांनी विलासराव देशमुख व त्यानंतर सुशीलकुमार शिंदे या दोघांच्याही मुख्यमंत्री कालावधीत वरील नियमावलीत आणखी बदल झाले. जमिनीच्या वाटपात गिरणीचे बांधकाम असलेली जागा वगळून केवळ मोकळ्या जागेचेच वाटप करण्याचा निर्णय झाला व गिरणी मालकांच्या वाट्याला गिरण्यांची ८० टक्के जमीन आली. इतके असूनही ज्या जमिनी कोणे एके काळी सरकारने अत्यंत फुटकळ किमतीत उद्योग उभा राहावा म्हणून मालकांना दिल्या होत्या, त्यावर नियमानुसार काम करावे तर तेही झालेले दिसत नाही. मुंबईसारख्या शहरात आयटीसारखा उद्योग उभा राहावा म्हणून संबंधित जमिनीवर ८० टक्के आयटी पार्क व्हावे व उर्वरित जमिनीवर इतर व्यावसायिक कामे करावीत, या नियमाला धाब्यावर बसवून बाकी सगळे धंदे राजरोसपणे गेले तीन दशके अव्याहत सुरू आहेत. हे सर्वसामान्यांच्या नजरेत दररोज येतच होते, मात्र चार वर्षांपूर्वी कुठल्या चर्चेत सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झाली किंवा कसे, हे शोधण्यासाठी समिती गेल्यावर आता पुन्हा जुने सत्य नव्याने समोर आले आहे. मुंबईत गाड्या उभ्या करणे ही मोठी समस्या असताना या गिरण्यांमधील पार्किंगसाठी महापालिकेच्या पार्किंगच्या दुप्पट तिप्पट भाडे आकारले जात असल्याचेही समोर आले आहे. इतकी मोठी जागा व इतका मोठा एफएसआय मिळूनही नियमांना पायदळी तुडवण्यामागील ही मानसिकता समोर दिसेल ते नियम धाब्यावर बसवून ओरबाडून खाण्याच्याच प्रवृत्तीचे निदर्शक आहे. अनेक ठिकाणी इमारतींच्या गच्चीत पावसाळ्याकरिता टाकलेले तात्पुरते छप्पर कायमस्वरूपी करून त्याचा व्यावसायिक वापर सुरू आहे. त्यामुळेच या गिरण्यांमधील इमारतींना अनेकदा आगी लागून त्यात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी घडल्याचा इतिहास ताजा आहे. आता विधिमंडळाच्या आश्वासन समितीला जे वास्तव दिसले त्याचा अहवाल ही समिती विधिमंडळात ठेवेलच. मात्र या अहवालावर राणा भीमदेवी थाटात अनेक जण केवळ 'साधक बाधक' चर्चा करतील व पुढे सगळे थंड बस्त्यात बांधून आपल्या देशातील राजकीय उच्च परंपरांचे पालन करतील की सर्वसामान्यांच्या घामातून उभ्या राहिलेल्या या शहराचा कारभार कायदे व नियमांनुसारच चालणार हे कठोरपणे दाखवून देतील, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# कोकण विभागातील उद्योजकांना वैध मापन शास्त्र विभागामार्फत मार्गदर्शन आणि चर्चासत्र

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागांतर्गत वैध मापन शास्त्र कोकण विभागाच्या वतीने कोकण विभागातील ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्हयातील उद्योग व आयातदार आस्थापनांसाठी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या मार्गदर्शन सत्रात महाराष्ट्र राज्य वैध मापन शास्त्र, मुंबईचे नियंत्रक सुधाकर तेलंग (भा. प्र. से.) यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास वैध मापन शास्त्र, कोकण विभागाचे सहनियंत्रक शिवाजी काकडे, इतर वरिष्ठ अधिकारी तसेच रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील सर्व औद्योगिक उत्पादन/आयातदार आस्थापनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी उत्पादक व आयातदारांनी उत्पादित/आयातीत वस्तूंवर बंधनकारक असणाऱ्या माहितीचे विवरण, विक्री प्रक्रियेत होणाऱ्या अडचणी व ग्राहकांच्या तक्रारींबाबत चर्चा करण्यात आली.

वैध मापन शास्त्र अधिनियम २००९ आणि महाराष्ट्र वैध मापन शास्त्र नियम २०११ यानुसार सर्व उत्पादक व आयातदारांनी आपल्या वस्तूंवर आवश्यक माहिती नमूद करणे बंधनकारक आहे. चुकीची माहिती, अपूर्ण तपशील किंवा ग्राहकांची फसवणूक होऊ नये यासाठी हे नियम काटेकोरपणे लागू करण्यात आले आहेत.

सत्रात विशेषतः इलेक्ट्रॉनिक मापे तोलन उपकरणे वापरताना अचूकता राखणे, ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणे तसेच आस्थापनांनी तक्रारींचे निवारण करण्यासाठी ई-मेल व दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देणे याबाबत मार्गदर्शन केले गेले.

## श्रीवर्धन तालुक्यात दीड दिवसाच्या गणरायाला भावपूर्ण निरोप



**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यात भाद्रपद ४ शु. गणेश चतुर्थी दीड दिवसांच्या एकूण २२६० गणपती बाप्पांची स्थापना करण्यात आली होती. आज भावपूर्ण वातावरणात दीड दिवसाच्या गणरायाला तालुक्यातील अरबी समुद्रात तसेच खेडेपाड्यातील लागत असलेल्या नदी मध्ये निरोप देण्यात आला.

श्रीवर्धन शहरातील बाप्पांच्या विसर्जनासाठी शहारालागत असलेल्या समुद्रात विसर्जनासाठी नगरपालिकेच्या वतीने स्वागत करून नीरमाल्य विसर्जनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती, समुद्राला उधाण असल्याने भाविकांसोबत जीव रक्षक बंड्या आगरकर तसेच रुची बोरकर या स्वतः जात होत्या, कायदा व्यवस्था राखण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गरजे व पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## खांब विभागात दीड दिवसांच्या गणपतींचे भक्तीमय वातावरणात विसर्जन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

गणेश चतुर्थीच्या दिवशी मोठ्या भक्तीमय वातावरणात घरोघरी आगमन झालेल्या दीड दिवसांच्या गणरायांचे मोठ्या जल्लोषात व भक्तीमय वातावरणात विसर्जन करण्यात आले.

गणपती बाप्पा मोरया,पुढच्या वर्षी लवकर या अशाप्रकारचा जयघोष करीत खांब विभागातील तमाम गणेशभक्तानी आपल्या लाडक्या बाप्पांना भक्तीमय वातावरणात निरोप दिला.

गणेश चतुर्थीच्या मोठ्या आनंददायी वातावरणात गणरायाची घरोघरी स्थापना केल्यानंतर दीड दिवसात मनोभावे पूजन, भजन, आरती, हरिपाठ, किर्तन, जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रमाबरोबरच पुरूषांचे कलगीतुरा नाच व छब्बो डान्स तर महिला वर्गाने झिम्मा फुगडी, मंगळागौर,फेर धरून नाचणे आदी करमणूक व मनोरंजनाचे कार्यक्रमही घरोघरी करण्यात आले. एका दिवसाच्या विश्रांतीनंतर विसर्जनाचे दुसऱ्या दिवशी मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात विसर्जन केले. ऐन विसर्जन मिरवणुकीत पावसाने जरी हजेरी लावली तरी गणेश भक्तांचा उत्साह मात्र कायम होता.

## जिल्ह्यातील कोकणवासी नागरिकांनी ई-केवायसी तात्काळ पूर्ण करावी

**दै.रायगड नगरी । रायगड**

गणेशोत्सव सणानिमित्त बाहेरगावी राहणारे कोकणवासी नागरिक आपल्या गावी आलेले आहेत. शासनाच्या सूचनेनुसार सर्व लाभार्थ्यांनी १०० टक्के ई-केवासयी पूर्ण करणे आवश्यक आहे. सदर लाभार्थ्यांनी आपल्या जवळच्या स्वस्त धान्य दुकानात जाऊन कुटुंबातील सर्व सदस्यांची ई-केवासयी तसेच सर्व स्वस्त धान्य दुकानदारांनी संबंधित लाभार्थ्यांशी संपर्क साधून व त्यांच्याकडे पोहोचून १०० टक्के ई-केवायसी तात्काळ पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड सर्जेराव सोनावणे यांनी केले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्याचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची (शिधापत्रिकाधारक) ई- केवायसी असणे शासनाने अनिवार्य केलेले आहे. लाभार्थ्यांचे शिधापत्रिकासोबत संलग्न करण्यात आलेले आधार क्रमांक बरोबर असल्याचे तसेच शिधापत्रिकेमध्ये नमूद असलेली व्यक्ती त्याच आहेत याची खात्री करण्यासाठी ई-केवायसी यंत्रणा उपलब्ध करण्यात आली आहे. शिधापत्रिकांसोबत संलग्न करण्यात आलेले आधार क्रमांकाचे प्रमाणिकर पूर्ण करण्यासाठी व रास्तभाव दुकानस्तरावर ई-केवासयी मोहिम राबविण्यात येत आहे. शासनाचे निर्देशान्वये धान्याचा लाभ घेणाऱ्या सर्व पात्र शिधापत्रिकाधारकांची १०० टक्के ई-केवायसी करण्याबाबत सुचित केले आहे. गणेशोत्सव सणानिमित्त बाहेरगावी राहणारे कोकणवासी नागरिकांनी ई-केवायसी न केल्यास आपल्या शिधापत्रिकेवरील धान्याचा लाभ बंद झाल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित लाभार्थी यांची राहील.

## अज्ञात चोरट्यांनी घरकाम करणाऱ्या महिलेची सोनसाखळी हिसकावली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरकाम करून स्वतःचा उदरनिर्वाह करणाऱ्या महिलेला चोरट्यांनी सकाळी नऊ वाजता कामावर जाताना लुटल्याची घटना खारघर येथील सेक्टर ३५ मधील हाइडपार्क सोसायटीच्या पाठीमागील रस्त्यावर घडली.

ओवे कॅम्प येथे राहणाऱ्या ४७ वर्षीय महिला चालत जात असताना दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी महिलेची सोनस-ाखळी हिसकावली. या बाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वाचकांसाठी विनम्र सूचना

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


### गाळा विकणे आहे

**नवीन कोर्टा समोर दुकानी (शॉप) ६५० स्के फुट गाळा विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा.**

**9892181313**


परिशिष्ट एच, क्रमांक ४
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, पनवेल**
श्रीमती अभिव्यक्ती सुनिल बडगुजर यांचे न्यायालयात
२रे सहदिवाणी न्यायाधिश, व. स्तर, पनवेल, पनवेल, रायगड.
**कारण दाखवा नोटीस (सर्वसाधारण नमूना)**
(आदेश ३८, नियम ६)
विवाह अर्ज/२८३/२०२२
सिध्दोधन बळीराम कदम वि. समिक्षा सिध्दोधन कदम
पुढिल तारिख : ०९-०९-२०२५
नि.नं.१४/ड

प्रति,
समिक्षा सिध्दोधन कदम
नेरुळ ता. ठाणे, MAHARASHTRA

ज्याअर्थी, वर नामनिर्दिष्ट केलेला याने या न्यायालयाकडे असा अर्ज केलेला आहे; म्हणून, याद्वारे तुम्हाला ताकीद देण्यात येते की, तारीख ०९-०९-२०२५ रोजी मध्यान्ह ११ वाजता तुम्ही या अर्जाविरुध्द कारण दाखविण्यासाठी या न्यायालयामध्ये हजर रहावे; तसे करण्यास तुम्ही चुकला तर, उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी करून निर्णय देण्यात येईल.

आज २८-०७-२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**२ रे सहदिवाणी न्यायाधिश, व.स्तर, पनवेल**

ecourts.gov.in या संकेतस्थळावर संकेतस्थळावर पुढील घडामोडींसाठी भेट द्या किंवा eCourts Services हे मोबाईल ॲप डाउनलोड करा.

सदरहू कामगिरी संगणक प्रणाली मधुन अधिकृत वापरकर्त्यादास निर्मित असल्यामुळे प्रत्यक्ष स्वाक्षरी केलेली नाही.

कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**सहा.अधिक्षक (प्रशासन)**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

या जाहिर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील भू-मालक : १. सौ. जयवंती जनार्दन डोलकर, रा. गणेशपुरी, पोस्ट-उलवा, तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६. २. सौ. योगिता जनार्दन डोलकर, रा. गणेशपुरी, पोस्ट-उलवा, तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६. ३. श्री. अतिश जनार्दन डोलकर, रा. गणेशपुरी, पोस्ट-उलवा, तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६. ४. सौ. वृशाली जनार्दन डोलकर, रा. गणेशपुरी, पोस्ट-उलवा, तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६. वरील सर्व भू-मालक व खरेदीदार श्री. गिरीशकुमार शर्मा, रा. बिल्डिंग क्र. ५३/१०१, एन.आर.आय. कॉम्प्लेक्स, फेज-२, सेक्टर-५४/५६/५८, सीवूड्स इस्टेट, नेरुळ (प), नवी मुंबई - ४००७०६ यांच्यामध्ये त्रिपक्षीय करारनामा (Tripartite Agreement) करण्यात आलेला आहे.

**सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :**
**नोड- पुष्पक नोड, तालुका- पनवेल, जिल्हा- रायगड**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| पुष्पक नोड | २५ अ | २३३ | ४० चौ.मी. |

तरी, वरिल वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणत्याही व्यक्ती, संस्था, कंपनी किंवा बँकेचा दान, गहाण, तारण, लीन, चार्ज, विक्री, खरेदी किंवा अन्य कुठल्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा अथवा हरकत असल्यास, त्यांनी ती कागदोपत्री पुराव्यानिशी या जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर समक्ष येऊन मूळ कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी व त्याबाबत लेखी पोहोच घ्यावी.

वरील मुदतीत जर कोणत्याही व्यक्ती/संस्थेकडून हरकत नोंदविण्यात आली नाही, तर सदर मिळकत ही निर्वेध, नि:जोखमी व कोणत्याही अडचणीशिवायची आहे असे समजून आमचे अशिल संबंधित व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कुणाचीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

कळावे
ठिकाण : नवी मुंबई
दि.२८/०८/२०२५

**सही/-**
**ॲड.अनुराधा पी. टिल्लु**
**ॲड.सुनिता राम पाटील**
**कार्यालय नं. २६, प्रभात सेंटर,**
**सेक्टर-१ ए, सीबीडी बेलापूर,**
**ता. जि. ठाणे, नवी मुंबई-४००६१४**

### जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहिर सुचना देण्यात येते की, १. श्री मनोहर हसुराम म्हात्रे २. श्री एकनाथ हसुराम म्हात्रे ३. श्री नामदेव हसुराम म्हात्रे ४. कु. पायल भालचंद्र म्हात्रे राहणार : ३४५- २, सेंन्ट्रल जेल रोड, सेक्टर ३७, इनामपुरी, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र ४१०२१० यांना सिडको लि, कडून मौजे नोड खारघर, येथील फाईल नं. ४३९ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भुखंडांचे वाटप झालेले आहे. सदर भुखंड हे वर उल्लेख केलेले शेतक-यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजने अंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई, कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजुर होऊन त्याप्रमाणे सदर भूखंडाचा करारनामा झाला आहे. त्याप्रमाणे माझे अशिल १) श्री तैझुन शब्बीर बेअरिंगवाला राहणार: फ्लॅट नं ७ पहिला मजला, रिहानाबाद सी एच एस, स्पेंन्स रोड, वोडाफोन गॅलरी जवळ, भायखळा, मुंबई, महाराष्ट्र ४००००८ २) श्री जहुर अहमद गुलाम मो पटेल राहणार घर नं. १३८१, बाग मोहल्ला, ऊर्दू शाळेजवळ, तळोजा पंचानंद, तळोजा मजकुर, रायगड, महाराष्ट्र ४१०२०८, ३) श्री आमीर अब्दुल आर. हमदुले, राहणार : राजवेल मोहल्ला, राजवेल, तालुका खेड, रत्नागिरी महाराष्ट्र ४१५७२७ यांनी खालील वर्ण न केलेला भूखंड त्रिपक्षीय करारनामा, विकासकरारनामा, हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशील**
**सिडको फाईल कमांक ४३९ खारघर नोड**

| नोड | सेक्टर | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| खारघर | ३५ ई | ६८ ए | २९८.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकती मध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी त्यानंतर येणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुषीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

दि.२८/०८/२०२५

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**शॉप नं.४५, पहिला मजला, क्रिस्टल प्लाझा,**
**सेक्टर ७, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

कोर्टाचे नाव : मा.हंगरगेकर साहेब
अर्जदारातर्फे वकील ॲड आशिष पनवेलकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दिवाणी चौ अर्ज - १०४४/२०२५
नि.नं.१०/ड
ने.ता.७/१०/२०२५

कै. शिवाजी रामचंद्र केंजळे (मयत) यांचे वारस
१. श्रीमती. मंगला शिवाजी केंजळे
वय : ७० व्यवसाय : गृहिणी
राहणार - सुर्योदय एपीटी केएल / ५ बिल्डींग नं. २६,
फ्लॅट नं. ०:४, तळ मजला सेक्टर -३ई कळंबोली नोड
ता. पनवेल जि. रायगड पिन कोड ४१०२१८
२. श्री. संजय शिवाजी केंजळे
वय : ५४ व्यवसाय : काही नाही
राहणार - सुर्योदय एपीटी केएल / ५ बिल्डींग नं. २६,
फ्लॅट नं. ०:४, तळ मजला सेक्टर-३ई कळंबोली नोड
ता. पनवेल जि. रायगड पिन कोड - ४१०२१८
३. श्री. भास्कर शिवाजी केंजळे
वय : ४१ व्यवसाय - रिक्षाचालक
राहणार - सुर्योदय एपीटी केएल / ५ बिल्डींग नं. २६,
फ्लॅट नं. ०:४, तळ मजला सेक्टर -३ई कळंबोली नोड
ता. पनवेल जि. रायगड पिन कोड - ४१०२१८ अर्जदार क्र १ ते ३
विरूध्द
कोणीही नाही सामनेवाला

या जाहीरनोटीशीने सर्व जनतेस कळविण्यात येते की कै. शिवाजी रामचंद्र केंजळे (मयत) यांचा दिनांक २८/०७/२०२३ रोजी राहत्या घरी सुर्योदय एपीटी केएल / ५ बिल्डींग नं. २६ फ्लॅट नं. ०:४, तळ मजला सेक्टर ३ई कळंबोली नोड ता. पनवेल जि. रायगड पिन कोड ४१०२१८ येथे निधन झाले होते. कै. शिवाजी रामचंद्र केंजळे यांचे कायदेशीर वारसदार अर्जदार क्र १ ही पत्नी असुन अर्जदार क्र २ व ३ हे मुलगे आहे.

कै. शिवाजी रामचंद्र केंजळे ( मयत) यांच्या ५० टक्के मालकीहक्क असलेल्या मिळकतीचे वर्णन

**मिळकत क्र १**

सुर्योदय एपीटी केएल / ५ बिल्डींग नं. २६,
फ्लॅट नं. ०:४, तळ मजला सेक्टर ३ ई, कळंबोली नोड,
ता. पनवेल जि. रायगड, राज्य महाराष्ट्र पिन कोड - ४१०२१८
Built up area - 33.21 sq.Mtrs

**मिळकत क्र २**

धिरा दर्शन कॉ ऑप हौसिंग सोसायटी फ्लॅट नं. ३०१,
तिसरा मजला प्लॉट नं. १२ सेक्टर १० ई रोडपाली गाव
कळंबोली ता. पनवेल जि. रायगड
admeasuring about 32.199 sq.Mtrs,
carpet+5.947 sq.Mtrs.
Flower bed +2.036 sq.Mtrs
open terrace 3rd floor

येणे प्रमाणे मिळकतीचे वर्णन असुन सदरहु मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरीता अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदारानंशिवाय कोणीही या मिळकतीला वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्यावावत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकिलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरून कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणारया हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २८ माहे ०८ सन २५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पनवेल महानगरपालिका

## पशुवैद्यकीय विभाग

**कार्यालय :– देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी,पनवेल –४१०२०६.**

दुरध्वनी कार्यालय : ०२२ – २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२– २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ – २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२– २७४५२३३९
ई–मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र.पमपा/पशुवैद्यकीय सेवा/ ९०८ /२०२५–२६ दिनांक: २८/०८/२०२५

## जाहीर सुचना

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात प्राण्यांच्या अंतविधीकरिता स्मशानभूमीची सोय करणेबाबत आवश्यक बाबींकरिता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे. इच्छुकांनी सदरचे निविदा दर दि. ११/०९/२०२५ रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे समक्ष सादर करावीत. सदर दिनांका नंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत. सदर बाबतचा तांत्रिक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No | Particular | | Qty | Rate |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply Installation and Commissioning of Dog (Pet) Incinerator, burning rate 40-50 kgs/hr. With primary and secondary chamber furnace trolley. Refractory Brick Alkali resistance alumina fire brick with furnace back up insulation like cold face insulation brick, Hot face Kynite brick, Refractory Castable, Mortar and ceramic fiber blanket, brief details as per enclosed specification. | | 1 No. | |
| | Type | Gas Fired LPG | | |
| | Furnace burning rating | 40-50 Kgs per hour | | |
| | Furnace Capacity | 50-100 kgs | | |
| | Overall dimension of furnace. | 2.2M (L) x 1.5M (W) x 2.2 M (H) Appx. | | |
| | Cremation chamber size. | 1.6 M (L) x0.9M (W) x 0.9 M (H) Appx. | | |
| | Furnace structural | ISMC-75 M.S. Channel framework covered with 3-6 mm thick CRCA M.S. sheets. | | |
| | Furnace charging door. | M.S. fabricated internally insulated with ceramic wool and provided with an electrically and mechanically operating system. | | |
| | Power system | 3-phase/415 volts/50 Hz/s with neutral. | | |
| | Operating load. | 10KW normal | | |
| | Operating temperature. | 800°C.to 900°C. 950 Deg. Maximum permissible. | | |
| | Refractory | Conforming to IS-8 and Superior | | |
| | bricks. | | | |
| | Insulation bricks. | Conforming to IS-2042 and Superior | | |
| | Combustion air blower. | Appx. 225 CFM centrifugal type provided with airflow control damper. | | |
| | Exhaust air blower. | Appx. 600 CFM centrifugal type made out of 304 SS materials. | | |
| | Burner | Supply and Installing Gas Fired reputed make Required. Burner fixing of Suitable Location for Cremator for Complete Cremation process. The 2 Nos burner Size and Specifications is Standard Size and spares should be easily available in the market. | | |
| | Control panel. | This shall be made out of 14 SWG sheet metal works and painted with anti-corrosive paints. The control panel is very simple in operation and maintenance. If incorporates all switchgear required for furnace equipment, etc. It also includes Ammeter, Voltmeter, and Energy meter temp. Controller, Burner sequence controller, Connectors & terminals etc. All internal wiring is done with copper conductors suitable for 1.1 KV. Power connection to the control panel. | | |
| 2. | Scrubber Unit- Ventury Type Wet scrubber unit with 1.5 HP water pump & SS304 Spray Nozzles Water scrubber-This shall be provided to control air pollution emissions within 150mg/M³ as specified by Maharashtra Pollution Control Board. The water scrubber shall be fabricated out of 3mm thick AISI 304 SS plate & provided with specially designed spray nozzles, mist eliminator, dampers etc. This is coupled with AISI 304 SS 2HP suction blower( with VFD Drive) for efficient scrubbing of flue gases. The inlet water connection & drain connection, and scrubber to chimney connection with SS304 Pipe, support etc. complete.. | | | |
| 3. | CHIMNEY- Big animal Incinerator Chimney will be Used | | | |
| 4. | Supply, Installation, Testing & Commissioning of Gas Manifold unit along with Gas Train , Gas Hose Pipe , Regulator, MS Seamless pipe line upto burner. | | | |
| 5. | Annual maintenance of Incinerator | | | |
| 6. | Annual maintenance charges from 2nd Year will be 10% increase of Basic value Every Year. | | | |

**Animal Crematorium For Big Animal**

| Sr No. | Description of Item | | Unit | Rate |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply Installation & commissioning of gas-fired Incinerator for big dead animal Capacity 500 Kgs Approx. Burning Rate 100-125 Kgs/Hr. With primary & secondary chamber furnace trolley and overhead crane 2 Ton Capacity | | Set | |
| | Type | PNG/LPG fired | | |
| | Furnace Capacity/ Burning rating | Capacity 500 Kgs. 100-125Kgs/Hr. Burning Rate | | |
| | Overall dimension of furnace. | 3.75M (L) x 3 M (W) x 4 M (H) Appx | | |
| | Cremation chamber size. | 3 M (L) x 2 (W) x 1.50 M (H) Appx.. | | |
| | Furnace structural | ISMC-100 M.S. Channel framework covered with 5-6 mm thick MS sheets. | | |
| | Heating Chamber | Dually Insulated with Alkali Resistant High Density Refractory Bricks/Blocks | | |
| | Furnace charging door. | M.S. fabricated internally insulated with ceramic wool & provided with electrically & mechanically operating system. | | |
| | Power system | 3-phase/430 volts/ 50Hzs with neutral. | | |
| | Operating load. | 30 Kw capacity | | |
| | Operating temperature. | 850°C To 900°C 1050°C Maximum permissible. | | |
| | Refractory bricks & suction duct Insulation | Alkali Resistant High Density Refractory & Superior | | |
| | High Temperature & High Alumina Insulation bricks. | Conforming to IS-2042A & superior | | |
| | Combustion air blower. | Combustion Air Centrifugal Blower, Pressure- 36" Wg,Capacity-1500cfm, Top Vertical Discharge , Drive- Direct Driven, 15hp, 3 Phase | | |
| | Exhaust air blower. | Centrifugal Blower Capacity- 2100cfm 10"Wc Pressure Moc.:-SS 304, Motor 10 hp /1440rpm Drive Belt Driven Casing -SS 304 3mm Thk. Impeller & Hub SS 304 3 mm Shaft SS 304,Bearing SKF Make Pillow Block, Pulley Fenner Make Inspection Door & Drin Plug S- S304 With Impeller Dynamic Balancing & Painting Assembly, DOD :30° From Bottom Side | | |
| | Combustion System | Supply & Installation of Gas fired Wesman/Continental Make gas Burner Rating 1000 KW Qty3 Nos With suitable damper, Gas line, Solenoid valve, Spark plug sensor etc. for Combustion Chamber & Wesman/Continental Make gas Burner Rating 800KW Qty 1 Nos With suitable damper, Gas line, Solenoid valve, Spark plug sensor etc. for Secondary Chamber. | | |
| | Secondary Chamber | The primary purpose of the secondary chamber is to ensure the complete combustion of gases and particulates that were not fully oxidized in the primary chamber. The secondary chamber operates at a higher temperature than the primary chamber, typically around 850-1000°C. By promoting complete combustion, the secondary chamber helps in reducing the emission of harmful pollutants such as carbon monoxide (CO), volatile organic compounds (VOCs), and dioxins. This leads to cleaner exhaust gases being released into the atmosphere. | | |
| | Cabling &Earthing. | From furnace control panel to all furnace equipment, heaters are provided with armored PVC insulated copper conductor cable along with earthing, earth pits in proper manner, | | |
| | Control panel. | This shall be made out of 14 SWG sheet metal works & painted with anti-corrosive paints. The control panel is very simple in operation & maintenance. If incorporates all switchgears required for furnace equipment, Burners, etc. It also includes PID temperature controller with Burner Sequence controller, Ammeter, Voltmeter, Energy meter temp. Controller, terminals etc. All internal wiring is done with copper conductors suitable for 1.1 KV. Power connection to the control panel. All Switchgears Siemens/ L&T/Schneider make only | | |
| 2. | Water scrubber | Ventury Type Wet scrubber unit with 1.5 HP water pump & SS304 Spray Nozzles Water scrubber-This shall be provided to control air pollution emissions within 150mg/M³ as specified by Maharashtra Pollution Control Board. The water scrubber shall be fabricated out of 3mm thick AISI 304 SS plate & provided with specially designed spray nozzles, mist eliminator, dampers etc. This is coupled with AISI 304 SS 7.5 HP suction blower( with VFD Drive) for efficient scrubbing of flue gases. The inlet water connection & drain connection, and scrubber to chimney connection with SS304 Pipe, support etc. complete. | | |

पृष्ठ ४ वर...

पृष्ठ ३ वरुन

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3. | M.S. Chimney | Chimney offered is self-supporting made out of suitable M.S. plates provided with ladder, platform for air pollution monitoring purpose. The chimney size shall be 600mm dia at top, 1200mm dia at bottom with height up to 30.5M with necessary EN-8 foundation bolts. The chimney tope shall be provided with, copper lighting arrestor with G.I. earthing strip, Aviation lamp & earth pit. The chimney shall be internally painted with heat resistant aluminum base paint & externally with black epoxy paint. chimney shall be conforming IS.( Chimney Height As per CPCB/UKPCB Norms.) | | |
| 4. | RCC Foundation | Foundation for self-supported chimney as per given Specification RCC Foundation- ,Foundation 2600 x 2600x 2000mm, M-25 Grade RMC Concrete, TMT bar 10 to 16 mm dia.With soil testing report. | Nos | |
| 5. | Supply, Installation, Testing & Commissioning of Gas Manifold unit along with Gas Train , Gas Hose Pipe , Regulator, MS Seamless pipe line upto burner. | | | |
| 6. | Annual maintenance of Incinerator | | 1 Year | |

या कामी अटी व शर्ती खालील प्रमाणे:-

१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र.
२. पॅनकार्ड ( संस्थेचे नावाने अथवा मालकाचे नावाचे )
३. नमुद केलेले दर हे सर्व प्रकारचे वाहतुक खर्चासह समाविष्ठ असावेत.
४. सदरची जाहीर सूचना फक्त दर खात्री करणे करीता मागविणेत येत आहे.
५. या कामी काही माहीती हवी असलेस पशुवैद्यकीय विभागाकडे संपर्क साधावा.
६. या कामी दरांची खात्री झालेनंतर जाहीर ई-निविदा मागविणेत येईल.
७. प्राप्त जाहीर निविदा सूचना दर स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निविदा समितीला असतील.

**सही/-**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# प्रशासनाने दस्तुरी नाक्यावरील पर्यटकांना अभिप्रेत सोयीसुविधा कायमस्वरूपी सुरळीत ठेवाव्यात ; स्थानिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानला येणाऱ्या पर्यटकांना मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावरून शहरात येण्यासाठी जी काही आवश्यक माहिती ध्वनिक्षेपकाच्या माध्यमातून देण्यात येत होती ती काही दिवसांपासून बंद झाल्याने शहरात जाण्यासाठी वाहतुकीची कशाप्रकारे सुविधा उपलब्ध आहे याबाबत पर्यटकांना माहिती मिळत नाही त्यामुळे अनेकदा याठिकाणी पर्यटकांची दिशाभूल होत असल्याने दस्तुरी नाक्यावर माहिती फलक त्याचप्रमाणे कोणकोणती वाहतुकीची सुविधा आहे याबाबत प्रशासनाने पुढाकार घेऊन पर्यटकांना अद्ययावत माहिती मिळण्याची सोय करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.



काही वर्षांपासून दस्तुरी नाक्यावर ज्याप्रकारे पर्यटकांची दिशाभूल होऊन त्यांना चुकीच्या पद्धतीने मार्गदर्शन केले जात होते त्यामुळे या स्थळाची प्रतिमा दिवसेंदिवस मलिन झाली होती. याचा इथल्या पर्यटनावर विपरीत परिणाम होऊन याची प्रामुख्याने झळ ही स्थानिकांना,व्यापारी, दुकानदार यांना मोठया प्रमाणात सोसावी लागत होती याकामी माथेरानप्रेमी नागरिकांनी पर्यटन बचाव संघर्ष समिती स्थापन करून दस्तुरी या ठिकाणी सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी संघर्ष केल्यानंतर दस्तुरी नाक्यावर ध्वनिक्षेपक द्वारे विविध भाषामधून माहिती देण्यास सुरुवात झाली होती.त्यामुळे पर्यटकांना आपल्या सोयीनुसार तेथील घोडा, हातरीक्षा,मिनिट्रेनची शटल सुविधा आणि ई रिक्षाच्या माध्यमातून प्रवास करणे सोयीचे बनले होते. परंतु ध्वनिक्षेपक बंद झाल्याने पर्यटकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. याठिकाणी साधा माहिती फलक लावण्याची हिम्मत प्रशासनात नव्हती त्यावेळी पर्यटन बचाव संघर्ष समितीच्या आंदोलनाच्या रेट्यामुळे

या महत्त्वाच्या गोष्टी सुरू करण्यात आल्या होत्या. त्यामुळे लवकरच सर्व गोष्टी पुन्हा एकदा सुरू करून इथले पर्यटन कशाप्रकारे बहरेल यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.ध्वनिक्षेपक सुविधा बंद करण्यासाठी कुणी राजकीय पक्षांच्या मंडळींनी प्रशासनाला धारेवर धरले तर नाही ना ? असाही प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित केला जात आहे.

यावेळी बोलताना चंद्रकांत जाधव म्हणाले की, माथेरान येथील पर्यावरण अबाधित राहावे येथे जगभरातून येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाची फसवणूक होऊ न देता येथील पर्यटनाचे योग्य मार्गदर्शन झाले पाहिजे त्यांना सन्मानपूर्वक वागणूक मिळाली पाहिजे व इथल्या पर्यटन व्यवसायात भर पडावा केवळ या उद्देशातून माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीची स्थापना झाली यामध्ये सर्वपक्षीय प्रतिनिधीचा समावेश आहे आणि या संदर्भात कर्जत खालापूर मतदार संघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली माथेरान नगरपरिषदेच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे सभागृहात सर्व विभागाच्या अधिकारी वर्गासोबत बैठक झाली होती आणि त्यामध्ये माथेरानच्या विविध समस्यावर पर्यटकांना अधिक चांगल्या सुविधावर चर्चा करून निर्णय घेण्यात आले होते मात्र स्थानिक प्रशासनाकडून अद्याप कोणत्याही निर्णयाची अंमलबजावणी झालेली दिसत नाही.मग असा प्रश्न निर्माण होतो की आमदार यांच्या उपस्थितीत पार पडलेली बैठक केवळ कागदोपत्री होती का ?आणि संघर्ष समितीने यासाठी पुन्हा आंदोलन करायला पाहिजे का ? माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीने स्थानिक प्रशासनाकडे याबाबत वारंवार विचारणा करण्यात आली मात्र थातूर मातुर उत्तरे दिली जातात हे अत्यंत खेदजनक असून येणाऱ्या काळात स्थानिक प्रशासनाने योग्य ती पावले उचलून व ठोस उपाययोजना करून माथेरानकरांना अपेक्षित असणाऱ्या समस्या लवकरात लवकर दूर कराव्यात.



खारघर सत्यम अपार्टमेंट येथील गणरायाचे दर्शन घेताना प्रफुल्ल प्रभाकर घरत आणि सौ.रुचिता प्रफुल्ल घरत



उरण तालुक्यातील चिरनेर येथील पत्रकार – जीवन केणी यांच्या घरी सिहासनावर आरूढ झालेली हिरव्या वृक्षांनी सजलेली पेशवाई गणपतीची देखणी मूर्ती भक्तांचे लक्ष वेधून घेत आहे.



उरण,पनवेल,नवीमुंबईसह रायगड जिल्ह्यातील नामांकित ठेकेदार पी.पी. खारपाटील,राजेंद्र खारपाटील यांच्या चिरनेर येथील पारस बंगला निवासस्थानी बसाविण्यात आलेली पानाफुलांनी सजलेली आणि सोनेरी अलंकारानी नटलेली दगडूशेठ हलवाई गणपतीची भव्य,सुबक मूर्ति



रायगड प्रेस क्लबचे मुख्य संघटक पत्रकार शशिकांत मोरे यांच्या धाटाव येथील निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या गणरायासमोर पंढरपूर नगरीत निघालेल्या वारकऱ्यांचा पायी दिंडी देखावा साकारण्यात आला आहे. याप्रसंगी गणरायाचे दर्शन घेताना चिमुकली शौर्य



श्रीवर्धन येथील निखिल भुसाणे यांचे निवासस्थानी विराजमान श्री गणराज.



तहसीलदार समीर घारे यांचे निवासस्थानी विराजमान श्री गणराज

# माणगावातील वाहतूक कोंडीचा गणेश भक्तांना आश्चर्याचा धक्का

**दै.रायगड नगरी । माणगाव**

वर्षाच्या १२ महिने महिन्याच्या तीसही दिवस मुंबई – गोवा मार्गावरील माणगावची वाहतूक कोंडी सर्वश्रुत असून गणेशोत्सव काळात तर ही डोकेदुखी शंभरपट नाही तर हजारपट म्हटले तर अतिशोक्ती ठरणार नाही. अशा प्रकारें गणेशोत्सव काळात, वाहतूक पोलिस खात्याला धडकी भरवणारी माणगाव मधील वाहतूक कोंडीची समस्या, यावर्षी पोलिस प्रशासनाच्या नियोजनबद्ध मार्गदर्शनाखाली सेवा फाउंडेशन माणगाव या संस्थेच्या कार्यकर्त्यांकडून यशस्वीरित्या पार पाडली. त्यामुळे वाहतुकीचा धसका घेतलेल्या कोकणवासीय गणेश भक्तांनी आभार व्यक्त करत त्यांना खूप धन्यवाद देताना दिसत होते.

मुंबई – गोवा महामार्ग, दिघी – पुणे महामार्ग यासोबत काही राज्य मार्ग आणि स्थानिक दळणवळणाचे मार्ग यांचा एकत्र संगम होतो ते रायगड जिल्ह्यातील माणगाव शहर हे गेली अनेक वर्ष वाहतूक कोंडीचे आगार बनले असून वर्षाच्या १२ महिने महिन्याच्या ३० दिवस ही डोकेदुखी प्रशासनासह वाहतूक पोलीस खात्याला अधिक डोकेदुखी आहे. यामध्ये कोकणवासीयांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार म्हणजे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होईल या आश्वासना शिवाय गेली अनेक पावसाळे पाहणाऱ्या मुंबई गोवा महामार्गाची अवस्था म्हणजे हा महामार्ग कोणाच्या अख्तरीत येतो की नाही, याचा वाली कोणी आहे की नाही असे वाटल्याशिवाय राहणार नाही अशी भयानक अवस्था गेली अनेक वर्ष कोंकणवासिय भोगत असून कोणत्याही सत्ताधाऱ्यांना किंवा स्थानिक लोकप्रतिनिधीना याबद्दल कोणतेही सोयर- सुतक असल्याचे दिसून येत नाही. पावसाळ्यापूर्वी पूर्ण होईल अशा आश्वासनाखेरीज अनेक पावसाळे पाहणारे या मार्गाचा वाली कोण ? असा संतापजनक सवाल कोकणवासीय (कोकणचे भाग्यविधाते, विकासाचा महामेरू, कार्यसम्राट, कैवारी) कोकणच्या स्थानिक लोकप्रतिनिधींना विचारत आहेत.

अशा महाभयंकर महामार्गावरून प्रवास करणारे प्रवाशी माणगाव मधील वाहतूक कोंडीचा धसका घेत असून गणेश उत्सव कालात अनेक पटीने वाढणाऱ्या वाहतुकीतून कसा मार्ग निघेल या विवंचनेत असणाऱ्या गणेश भक्तांना यावर्षी मात्र आश्चर्याचा धक्काच बसला असून न अडकता न ताटकलता सहजपणे मार्गस्थ होत आले. त्याबद्दल पोलीस प्रशासनाच्या नियोजनबद्ध, अप्रतिम, मार्गदर्शनाखाली सेवा फाउंडेशन संस्थेच्या तरुण कार्यकर्त्यांनी अफाट परिश्रमाचे सर्वत्र कौतुक होताना दिसत असून माणगावातून समाधानकारक प्रवास करून मार्गस्थ होणाऱ्या कोकणातील लाखो गणेश भक्तांनी पोलीस प्रशासनासह वाहतूककामी सहकार्य करणाऱ्या जिल्ह्यात अग्रेसर ठरणाऱ्या सेवा फाउंडेशन संस्थेच्या सर्व तरुण कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त करून धन्यवाद देताना त्यांचे कौतुक करताना दिसून आले.